# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com

क्र.मजीप्रा/२०१३/सभा-१२९/(३८)/आ.४ दिनांक : २१.८.२०१३.

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

**विषय : दि.१६.७.२०१३ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२९ व्या सभेचे इतिवृत्त.**

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंगळवार दि.१६.७.२०१३ रोजी झालेल्या १२९ व्या सभेचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यांत येत आहे.

आपला विश्वासू,

(पंजाबराव वानखडे)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

सोबत : १२९ व्या सभेचे इतिवृत्त.
(पृ.क्र.१ ते २८)

(२)

प्रत,

१. मुख्य अभियंता, म.जी.प्रा, ना.व ग्रा.यो., ठाणे/जलव्यवस्थापन, ठाणे/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे/अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य, नाशिक/मध्यवर्ती नियोजन मित्तल टॉवर्स, मुंबई.

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.५, ६, १०, ११, १२, १३ व आयत्यावेळच्या कार्यक्रम बाब क्र.१ व ३ या बाबींवर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

२. संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

वित्त व लेखा शाखेशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.३, ७, ८ व १३ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

३. अधीक्षक अभियंता, (म.नि.सं.स.) / (मुख्यालय) म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

आपल्या शाखेशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.४, ५, १०, ११, १२, आयत्यावेळच्या कार्यक्रम बाब क्र.१, २, ३ तसेच आयत्यावेळी शिरभावी पा.पु.यो. बाबत दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

४. अधीक्षक अभियंता (यां.) म.जी.प्रा., ठाणे/नागपूर.

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.१२ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

५. उप मुख्य लेखा अधि.(१) व (२) म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

६. उप सचिव, पा.पु.व स्व.वि, मंत्रालय, मुंबई.

७. आस्थापना अधिकारी (द.), म.जी.प्रा., मुंबई.

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.१, २, ६, ७ व ९ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

८. प्रशासकीय नि आस्था.अधि., म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

९. कायदा व कामगार अधि., म.जी.प्रा., नवी मुंबई.

१०.मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कक्ष अधिकारी (आस्था. )/कार्यासन अधि(आस्था. ) यांच्या माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

११.उप अभियंता तथा व्यवस्थापक मालमत्ता कक्ष (आ.९), म.जी.प्रा. नवी मुंबई.

आपल्या शाखेशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र. ६ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

१२.सर्व लेखा अधिकारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व संबंधितांनी कार्यपूर्ती अहवाल दि.५.९.२०१३ पर्यंत सादर करावा.

सौ.ढापरे/md.Estt.४ (Kasture)

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२९ व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १२९ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.दिलीप सोपल यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १६ जुलै २०१३ रोजी सायंकाळी ४.०० वाजता संपन्न झाली.या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा. ना.श्री.दिलीप सोपल, मंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा. ना.श्री.रणजित कांबळे,राज्यमंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३) मा. ना.श्री.उदय सामंत,राज्यमंत्री,नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
४) मा. श्री.एस.एस.संधू,प्रधान सचिव,पा.पु.व स्व.वि. तथा प्राधिकरणाचे सदस्य.
५) मा. श्री.एस.एस.संधू,प्रधान सचिव,ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
६) मा. प्रधान सचिव,(वित्तीय सुधारणा),वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्यावतीने श्री. शि.म.म्हात्रे, सहसचिव, वित्त विभाग, मुंबई.
७) श्री. राधेश्याम मोपलवार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.पंजाबराव वानखडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
२) डॉ.श्री.हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागरी व ग्रामीण योजना, ठाणे.
३) श्री.माधव जवादे, मुख्य अभियंता (प्रभारी) म.जी.प्रा., जलव्यवस्थापन, ठाणे.
४) श्री.सुधाकर डांगे, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
५) श्री.एस.बी. भुजबळ, अधीक्षक अभियंता (प्रभारी),(म.नि.सं.स.कक्ष), म.जी.प्रा., मुंबई.
६) श्री.नरेंद्र तेजाळे, अधीक्षक अभियंता (यां.) म.जी.प्रा., ठाणे.

सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई यांनी, मा.मंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे नूतन अध्यक्ष, मा.राज्यमंत्री, पापुवस्व तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष व मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे नुतन उपाध्यक्ष यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

तद्नंतर, मा.मंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१ :**

**विषय :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२८ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

दि.२५ मार्च २०१३ रोजी संपन्न झालेल्या १२८ व्या सभेतील कार्यक्रम बाब क्र.४(ब)

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

अन्वये म.जी.प्रा.च्या सन २०११-१२ च्या वार्षिक लेख्यास मान्यता दिली आहे. तथापि इतिवृत्तामध्ये सन २०११-१२ ऐवजी सन २०१२-१३ चे वार्षिक लेख्यास मान्यता देण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. या चुकीची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. याबाबत सविस्तर चर्चा होवून सन २०११-१२ च्या वार्षिक लेख्यास मान्यता देण्यात येत आहे, अशी दुरुस्ती करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास, सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले. यासह दिनांक २५.३.२०१३ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२८ व्या सभेच्या सुधारीत इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२**

**विषय :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२८ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २५.३.२०१३ रोजी संपन्न झालेल्या १२८ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.तसेच निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास सविस्तरपणे अवगत केले. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.३**

**विषय :-** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारीत मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने म.जी.प्रा.ने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरती शिल्लक रक्कम योग्यरित्या गुंतवावी याबाबत शासनाकडून वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या जातात. त्यानुसार मजीप्राकडूनही अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुका केल्या जातात. यापैकी अल्प मुदतीच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव सर्वसाधारणपणे १५ दिवस ते १ वर्षापेक्षा कमी कालावधीतील वेगवेगळया टप्प्यासाठी प्रस्तावित केले जातात. त्यापैकी अल्प मुदतीच्या गुंतवणुका या, गुंतवणुक योग्य बँकासाठीचे व्याजदर मागविण्यात येऊन, या बँकाचे व्याजदर सर्वाधिक असतील अशा बँकांकडे मा.सदस्य सचिव व संचालक (वित्त) यांच्या मान्यतेने करण्यात येतात व त्यास मा.संचालक मंडळाची कार्योत्तर मंजूरी घेण्यात येते.

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

त्याचप्रमाणे दिर्घ मुदतीच्या (१ वर्षापेक्षा जास्त) गुंतवणुकीमध्ये घसारा निधी, सिंकींग फंड, पेन्शन फंड इ. गुंतवणुकीचा समावेश असून शासनाच्या वित्त विभागाच्या निर्देशानुसार या गुंतवणुका फक्त राष्ट्रीयकृत बँकेत करण्यात येतात. सदर गुंतवणुकीचे प्रस्ताव स्थापन केलेल्या समितीत सादर करण्यात येऊन त्यास ज्या दिवशी मान्यता प्राप्त होऊन नस्ती प्राप्त होते व गुंतवणुक करावयाची असते त्या दिवशी ज्या बँकाकडून पूर्वीचे व्याजदर प्राप्त झालेले असतात, त्या सर्व बँक़ांकडून पुन्हा व्याजदर प्राप्त करुन जे जास्त व्याजदर प्राप्त होतील, त्या बँकांमध्ये मा.सदस्य सचिव यांच्या मान्यतेने गुंतवणुक केली जात असल्याचे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

त्यानुसार परिशिष्ट प व फ वरील अनुक्रमे अल्प व दिर्घ मुदतीच्या दि.१६.३.२०१३ ते दि.६.५.२०१३ या कालावधीतील गुंतवणुकीस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्याची मा.संचालक मंडळास विनंती करण्यात आली. तथापी या बैठकीत संचालक (वित्त) यांनी, सादर केलेल्या पुढील म्हणजेच, दि.१२.७.२०१३ पर्यंतच्या कालावधीत केलेल्या अल्प मुदतीच्या गुंतवणुकीच्या प्रस्तावासही कार्योत्तर मान्यता प्रदान करण्याची विनंती करण्यात आली. त्यानुसार दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस परिशिष्ट-फ नुसार व सुधारित अल्प मुदतीच्या गुंतवणुकीस परिशिष्ट-प-१ नुसार कार्योत्तर मान्यता प्रदान करण्याची विनंती करण्यांत आली.

या कार्यक्रम बाबीवर चर्चा करीत असताना, मा.प्रधान सचिवांनी नमुद केले की, समितीकडे प्राप्त होणारे प्रस्ताव व त्यास मंजूरी प्रदान होईपर्यत लागणारा कालावधी हा त्या त्या स्तरावरील संबधीत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीवर अवलंबून असल्याने जादा वेळ लागतो. त्यामुळे प्रत्यक्षात गुंतवणुक करताना असणारे व्याजदर हे काही प्रसंगी प्रस्ताव सादर करतानाच्या व्याजदरापेक्षा कमी असू शकतात. अशा वेळी व्याजातुन मिळणारे उत्पन्न कमी होते. त्यासाठी सदर प्रस्ताव सादर करतानाच संबधित मंजूरी प्रदान करणाऱ्या समिती सदस्यांना दुरध्वनी, एसएमएस, झेरॉक्स वा ई-मेल द्वारे प्रत्येक स्तरावर अवगत करुन त्यांची मान्यता प्राप्त करुन गुंतवणुक करण्यात यावी व तद्नंतर प्रस्तावाच्या नस्तीवर तसे स्पष्ट करावे, अशा सूचना करण्यात आल्या. यावर चर्चा होऊन या सूचनेस मा.संचालक मंडळांनी अनुमती दर्शविली. त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

१) असा ठराव करण्यात येतो की, दि.१६.३.२०१३ ते दि.१२.७.२०१३ या कालावधीत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे अल्प मुदतीच्या गुंतवणूकीस परिशिष्ट - प-१ नुसार व दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस परिशिष्ट - फ नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२) असा ठराव करण्यांत येतो की, दिर्घमुदतीच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव यापुढे फॅक्स व ईमेलव्दारे गुंतवणूक समितीतील सदस्यांना सादर करावा.

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

सदस्य सचिव
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.४**

**विषय :-** नवीन चंद्रपूर शहरासाठी पूर्ण ठेव तत्वावर (म्हाडा) पा.पु.योजना, जि.चंद्रपूर १७.५ टक्के ऐवजी ९ टक्के ई अँड पी शुल्क आकारण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

चंद्रपूर जिल्ह्यातील नविन चंद्रपूर शहरांतर्गत असलेल्या मौजे दाताळा, खुटाळा, पडोळी व कोसारा या क्षेत्रांचा विकास करण्यासाठी, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र व विकास प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आली आहे. या विकासांतर्गत पाणी पुरवठा योजनेचा सुध्दा समावेश असून, त्या भागासाठी मजीप्राने पूर्ण ठेव तत्वावर पाणी पुरवठा योजना राबविण्याची विनंती सदर प्राधिकरणाने केली आहे. या योजनेची किंमत रु.६९.४४ कोटी इतकी असून, सदर अंदाजपत्रके व आराखडे प्राधिकरणाच्या प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहेत.

मजीप्राच्या धोरणानुसार सदर पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी १७.५% ई.अँन्ड पी. शुल्क अनुज्ञेय आहे. तथापि, सदरचे क्षेत्र ग्रामीण भागात असल्याने, या कामासाठी ९% शुल्क आकारण्याची विनंती प्राधिकरणाने केली आहे. त्यानुसार योजनेचा आवाका, मजीप्राचा अत्यल्प कार्यभार इ. बाबी विचारात घेऊन मजीप्रास या योजनेतुन रु.५.३२ कोटी इतके उत्पन्न मिळणार आहे. ही बाब विचारात घेऊन ९% शुल्क आकारण्यास एक विशेष बाब म्हणून मजीप्राने सहमती कळविली आहे. येथे नमूद करण्यात येते की, त्यानुसार या योजनेस प्रशासकीय मान्यताही प्राप्त झाली आहे.

सबब, मजीप्राने घेतलेल्या निर्णयास मा.संचालक मंडळाची कार्योत्तर मान्यता घेण्यासाठीची कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन या प्रस्तावास एक विशेष बाब म्हणून मान्यता प्रदान केली व त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :-

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र गृहनिमाण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या मागणीनुसार नविन चंद्रपूर शहरांतर्गत असलेल्या मौजे दाताळा, खुटाळा, पडोळी व कोसारा या क्षेत्रांच्या पाणी पुरवठयासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पूर्ण ठेव तत्वावर करावयाच्या पाणी पुरवठा योजनेच्या रु.५९.०९ कोटी निव्वळ किंमतीच्या पाणी पुरवठा योजनेचे काम **एक विशेष बाब** म्हणून प्रचलित १७.५% ऐवजी ९% या ई.अँन्ड पी.शुल्क दराने करण्यास एक विशेष बाब म्हणून मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्याचबरोबर या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने यापुंर्वी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरीही प्रदान करण्यात येत आहे.

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५**

**विषय :-** म.जी.प्रा.च्या नवी मुंबई येथील सिडको भवन इमारतीमधील दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील कार्यालयाचे नुतनीकरण करणे.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नवी मुंबई येथील सिडको भवन इमारतीच्या दक्षिण कक्षाकडील १ ते ४ मजले मजीप्राच्या मालकीचे असून, त्यापैकी दुसऱ्या मजल्यावर आस्थापना, अ.अ.(मु), अ.अ. (भानिक) व तिसऱ्या मजल्यावर संचालक (वित्त) यांचे कार्यालय आहे. या दोन्ही मजल्यांच्या नुतनीकरणास दि. २९.३.२०१२ रोजी संपन्न झालेल्या मा.संचालक मंडळाच्या १२३ व्या बैठकीत कार्यक्रम बाबीद्वारे सादर केलेल्या रु.१९८.३७ लक्ष किमतीच्या प्रस्तावास मान्यता प्रदान केली आहे. तथापि, सदर कामे करतेवेळीस प्रस्तावित करण्यात आलेल्या आसन व्यवस्थेत करावे लागलेले बदल व या कामाव्यतिरिक्त नव्याने मात्र अनिवार्य असलेली कामे करणे अत्यावश्यक असल्याचे प्रस्तावात नमुद केल्यानुसा मा.संचालक मंडळास अवगत करण्यात आले. यांमध्ये पुढील नमूद कामांचा समावेश आहे.

१. मा.संचालक (वित्त) यांच्या मागणीनुसार अस्तित्वातील त्यांच्या दालनाच्या आसन व्यवस्थेत करावे लागलेले बदल.
२. रेकॉर्ड रुम, सर्व्हर रुम व स्टोअर रुमसाठी पुरेशा जागा उपलब्ध केल्याने परिमाणात झालेली वाढ.
३. विद्युतीकरणाचे संपूर्ण काम नव्याने करणे गरजेचे झाल्याने.
४. अंतर्गत लेखा परिक्षण अधिकारी यांचे कक्ष अधिकचे वाढल्याने.
५. दुसऱ्या मजल्यावरील जलस्वराज कार्यालयास भाड्याने दिलेले जुने सभागृह तोडण्यास परवानगी न मिळणे.

सदर कामासाठी अधीकचा रु.१६४.७१ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. म्हणजेच एकूण रु. ३६३.०७ लक्ष इतका खर्च होईल. सबब, सदरची वाढीव कामे करणे अत्यावश्यक असल्याने, कार्यक्रम बाबीद्वारे सादर करण्यात येत असलेल्या प्रस्तावास मा. संचालक मंडळाने मान्यता प्रदान करावी, अशी विनंती केली. याबाबत सभेमध्ये वाढीव खर्चाची

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

सदस्य सचिव
**म.जी.प्रा.**

कारणमिमांसा करण्यास सांगितले असता, त्यानुसार सविस्तर चर्चा होऊन या प्रस्तावास मा. संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या दि.२९.३.२०१२ रोजी संपन्न झालेल्या १२३ व्या बैठकीत, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या सिडको भवन इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील पूर्ण कार्यालयाचे नुतनीकरणाच्या कामाच्या रु.१९८.३७ लक्ष किंमतीचा प्रस्ताव कार्यक्रम बाब क्र.३ व्दारे सादर करण्यात आला होता. त्यास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली आहे. सदर प्रस्तावाअंतर्गत कामे प्रगतीपथावर असताना, कामाच्या व्याप्तीत बदल/वाढ झाल्याने किंमतीमध्ये रु.१६४.७१ लक्ष इतकी वाढ होत आहे. त्यानुसार या कामाची एकूण किंमत रु.३६३.०७ लक्ष इतकी होत आहे.

त्यानुसार कार्यक्रम बाबीव्दारे मंजूरीसाठी सादर केलेल्या वाढीव सुधारित प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत असून, त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा.मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६**

**विषय :-** मजीप्राच्या मालकीच्या नवीन पनवेल येथील विखुरलेल्या व रिक्त सदनिका विकण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीची नविन पनवेल परिसरात एकूण ५० सदनिका आहेत. त्यापैकी ३६ सदनिका ३ स्वतंत्र इमारतीत आहेत. तर १४ सदनिका विखुरलेल्या आहेत. १४ सदनिकांपैकी ३ सदनिका कर्मचाऱ्यांना वाटप करण्यात आल्या आहेत. उर्वरीत ११ सदनिका रिक्त आहेत. वाटप करण्यात आलेल्या ३ सदनिकात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना स्वतंत्र इमारतीतील निवासस्थानात स्थलांतर करण्यात येईल. या १४ सदनिका बाजारभावाप्रमाणे इच्छूक म.जी.प्रा.कर्मचाऱ्यांकडून व खाजगी व्यक्तीकडून स्पर्धात्मक बोली मागवून, सर्वात जास्त बोली देणाऱ्यास विकण्याचे प्रस्तावित आहे. मात्र, सदर सदनिकांची विक्री करण्यापुर्वी प्राप्त झालेल्या कमाल देकारानुसार खरेदी करण्यास प्राधिकरणातील इच्छूक अधिकारी/कर्मचाऱ्यांनी इच्छूक असल्यास, त्यांना सदर सदनिका **"Right of first Refusal"** तत्वावर विकण्याचे प्रस्तावित आहे.

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

मात्र, तत्पूर्वी अशा म.जी.प्रा. च्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी निविदा भरणे बंधनकारक आहे. अधिकारी/कर्मचारी यांनी देकार दिला नाही तर, जास्तीत जास्त किंमतीचा देकार देणाऱ्यास सदनिका विकण्यात येतील. तथापि, जास्तीत जास्त आलेला देकार संचालक मंडळाची मान्यता घेऊन अंतिम करण्यात येईल. त्यानुसार या प्रस्तावास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान करण्याची विनंती करण्यात आली. या प्रस्तावावर चर्चा होऊन, यास मा.संचालक मंडळाने मान्यता देवून पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, नविन पनवेल येथील प्राधिकरणाच्या मालकीच्या विखुरलेल्या रिक्त निवासस्थानाकरीता प्राधिकरणास सद्यःस्थितीत दरवर्षी मालमत्ता कर इत्यादीसाठी होणारा नाहक खर्च टाळण्याकरीता तसेच प्राधिकरणावर येणारा आर्थिक भार कमी करण्याच्या दृष्टीने, सदरची विखुरलेली एकूण १४ निवासस्थाने अथवा नेमकी रिक्त असतील तितकी निवासस्थाने शासनाच्या प्रचलित नियमानुसार अथवा बाजारभावाप्रमाणे "जशी आहे तशी" या अटीवर विक्री करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तथापि असे करीत असताना, निवासस्थानाची विक्री करण्यापुर्वी म.जी.प्रा.च्या कर्मचाऱ्यांकडून तसेच खाजगी व्यक्तीकडून स्पर्धात्मक बोली मागविताना प्राप्त झालेल्या जास्तीत जास्त बोलीनुसार अथवा जाहीररित्या मागविलेल्या निविदेनुसार प्राप्त झालेल्या जास्तीत जास्त दरानुसार विक्री करावी. मात्र, सदर सदनिकांची विक्री करण्यापुर्वी प्राप्त झालेल्या जास्तीत जास्त बोलीनुसार प्राधिकरणाच्या इच्छूक अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रथम प्राधान्य तत्वावर **(Right of first refusal)** निवासस्थान विकत देण्याची कार्यवाही करावी. मात्र, अशा म.जी.प्रा.कर्मचाऱ्यांनी मूळात निविदा भरणे बंधनकारक आहे.तथापि, ज्या कर्मचाऱ्यांकडे मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पनवेल व खारघर येथे पती-पत्नीच्या नांवे मालकीची घरे आहेत. त्यांना या योजनेसाठी पात्र समजण्यात येऊ नये. तसेच जास्तीत जास्त आलेला देकार हा संचालक मंडळाची मान्यता घेऊन अंतिम करण्यात यावा.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **मा.मंत्री,** | |
| **पा.पु. व स्व. तथा** | सदस्य सचिव |
| **अध्यक्ष, म.जी.प्रा.** | **म.जी.प्रा.** |

९४८

(१०)

कार्यक्रम बाब क्र.७

विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१०-११ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

म.जी.प्रा. चे सन २०१०-११ चे वार्षिक लेखे दि.२३.९.२०१२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १२३व्या बैठकीमध्ये स्विकृत करण्यांत आले आहेत. हा स्विकृत लेखा परिक्षण अहवाल महालेखापाल-१, मुंबई यांनी प्रमाणित केला असून,

दि.२९.३.२०१३ रोजी मजीप्रास प्राप्त झाला आहे. सदर अहवाल अनुपालनासह मा.संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे अवगत केले. सदर अहवालास मान्यता प्राप्त झाल्यास, सदर अहवाल वार्षिक अहवालासोबत मा.विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्यात येईल. त्यानुसार या अहवालास मान्यता प्रदान करण्याची विनंती करण्यात आली. याबाबत सविस्तर चर्चा होवून मा.संचालक मंडळाने सन २०१०-११ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालास मान्यता प्रदान करुन पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१०-११ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालास अनुपालनासह मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०१०-११ चे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल महाराष्ट्र राज्याच्या विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहाकडे सादर करण्याकरीता शासनाकडे पाठविण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा.,मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

कार्यक्रम बाब क्र.८

विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील उप मुख्य लेखा अधिकारी या पदाच्या पदनामामध्ये बदल करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा शासन निर्णय क्र.मजीप्रा-२०१२/ प्र.क्र.३९९/पापु २३, दिनांक ७.१.२०१३ अन्वये म.जी.प्रा.तील वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी या पदाचे नामाभिदान संचालक (वित्त) असे केले आहे. संचालक (वित्त) यांच्या

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

लगतच्या पदाच्या पदनामामध्ये सुसूत्रता व सुसंगतपणा राहण्यांसाठी म.जी.प्रा.तील उप मुख्य लेखा अधिकारी ह्या पदाची वेतनश्रेणी महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातील सहसंचालक या पदाशी समकक्ष आहे. सबब या पदाच्या पदनामात बदल करुन ते **'सहसंचालक (वित्त)'** असे करण्याबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. यावर सविस्तर चर्चा होऊन उप मुख्य लेखा अधिकारी हे पद शासनाने मंजूर केलेले असल्याने, सदर पदाच्या पदनामात बदल करावयाचा असल्यास, त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे म.जी.प्रा.ने सदरचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यास मान्यता देवून पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सद्याचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी या पदाचे पदनाम **'संचालक (वित्त)'** असे सुधारित केल्यामुळे या पदाच्या नियंत्रणाखालील पदाच्या पदनामामध्ये सुध्दा सुसूत्रता व सुसंगतपणा रहाण्याच्या दृष्टीने उप मुख्य लेखाधिकारी हया पदाचे पदनाम दिनांक १.४.२००० च्या शासन निर्णयातील उल्लेखाप्रमाणे **'सहसंचालक (वित्त)'** असे सुधारीत करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करुन मान्यता घ्यावी. याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.९**

**विषय :-** क.अ./स.अ.श्रेणी-२/उप अभि./स.अ.श्रेणी-१/स.का.अ. व पदोन्नत उ.अ. /उ.वि.अ. (स्था./यां./वि.) यांच्या व्यावसायिक परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या अभियंत्यांना पुनर्तपासणीत उर्त्तीण घोषित केल्याचे कार्यवाहीबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

सन २००३, २००४ व २००८ या वर्षामध्ये अभियंता व्यावसायिक परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या कनिष्ठ अभियंता/ उप अभियंत्यांच्या उत्तर पत्रिकांची पुनर्तपासणी करण्याची मागणी अनुत्तीर्ण अभियंत्यांनी केली होती. सदर मागणीच्या अनुषंगाने, मध्यवर्ती कार्यालयाने तीन विविध आदेशान्वये (अनुक्रमे दि.२७.१.२००४ दि.१४.१२.२००४ व दि.२६.६.२००९) मुख्य अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, सदर समितीने सन २००३, २००४ व २००८ या कालावधीत अनुतीर्ण झालेल्या कनिष्ठ अभियंता / उप अभियंता यांच्या उत्तर पत्रिकांची पुनर्तपासणी करुन, सुधारित निकाल जाहीर करण्यात

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

आला. त्यानुसार एकूण २२ क.अ./स.अ.श्रे-२ व एकूण २७ स.का.अ./स.अ.श्रे-१ व पदोन्नत उ.अ/उ.वि.अ. (स्था./यां./वि.) यांना उत्तीर्ण घोषित करण्यात आले.

तथापि, श्री.हेबारे, माजी वरिष्ठ लिपीक, मजीप्रा, मिरज यांनी माहितीचा अधिकार अर्जातील माहितीव्दारे/तक्रारींव्दारे केलेली सदर कार्यवाही कोणतीही तरतूद /नियम नसताना केली असल्याने, उत्तीर्ण घोषित केलेली कार्यवाही रद्द करण्याची कार्यवाही करावी, त्याचप्रमाणे त्यांना दिलेल्या सवलती व आर्थिक फायदे काढून घेण्याचीही मागणी केली आहे.

याबाबत चर्चा करीत असताना, स्पष्ट करण्यात आले की, सार्वजनिक बांधकाम संहितेतील नियम-८ मधील तरतूदीप्रमाणे, सन २००३ व २००४ मध्ये एका विषयात जास्तीत जास्त २ गुण व एकत्रित ६ गुण वाढवून देण्यास मध्यवर्ती कार्यालयाने दि.२०.४.२००४ व दि.१६.१०.२००४ च्या पत्रान्वये अनुक्रमे परवानगी देण्यात आली होती. तथापि, सदर मुख्य अभियंता यांच्या अध्यक्षतेखालील समितीने उत्तर पत्रिकांची पुनर्तपासणी करुन, नियमात तरतूद नसताना उत्तरपत्रिकांची पुर्नतपासणी करुन गुणवाढ देऊन उत्तीर्ण घोषित करण्यात आले. त्यामुळे श्री.हेबारे यांनी केलेल्या तक्रार व मागणीनुसार, यापूर्वी केलेली कार्यवाही रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव व त्यानुसार त्यांना या निर्णयाच्या अनुषंगाने मिळालेले लाभ जसे आश्वासित प्रगती योजना, शाखा अभियंता दर्जा, वार्षिक वेतनवाढी, पदोन्नती इत्यादी काढून का घेण्यांत येऊ नये याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यास संधी देण्याकरिता त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे कार्यक्रम बाबीव्दारे मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे, मा.संचालक मंडळास अवगत केले.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने, मा.संचालक मंडळात सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेत मजीप्रामधील सद्यःस्थितीत उपलब्ध असणारे अभियंते, अनुत्तीर्ण ठरवावयाचे झाल्यास, त्यानुसार ४९ अभियंत्यांच्या (२२+२७) सेवांवर होणा-या दूरगामी परिणामाबाबत सखोल चर्चा करण्यात आली. हे स.का.अ./स.अ.श्रे-१/स.अ.श्रे-२ अभियंत्यांच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यांची मजीप्रामध्ये नेमणूक झाली होती व मजीप्रामध्ये त्यांची सेवा आता अंदाजे १० वर्षापेक्षा जास्त झाली आहे. या अभियंत्यांना परिक्षा पास झाल्यामुळे सेवाकाळात मिळालेले लाभ आता ९ ते १० वर्षाच्या कालावधीनंतर काढून घेणे योग्य ठरणार नाही. तसेच सदर अभियंत्यांपैकी सर्वच अभियंत्यांनी फेरतपासणीसाठी अर्ज केलेला नव्हता. तथापि, सर्वच परिक्षार्थींच्या उत्तर पत्रिकांची फेरतपासणी करण्यात आली असता, काही परिक्षार्थींच्या गुणांमध्ये वाढ झाली व ते उत्तीर्ण झाले. ते जर उत्तीर्ण झाले नसते तर, त्यांना लगेच पुढची व्यावसायिक परीक्षा देऊन उत्तीर्ण होण्याची संधी घेता आली असती. प्रस्तावित केल्यानुसार कृती केल्यास एकूणच सर्व

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

अभियंत्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, असे दिसून आले.

सबब, आता एवढ्या कालावधीनंतर तत्कालीन सदस्य सचिव यांनी मुख्य अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याच्या कार्यवाहीचा पुर्नविचार करण्याची आवश्यकता नसून, आहे तीच कार्यवाही कायम ठेवण्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले व त्यानुसार ४९ अभियंत्यांना पुनर्तपासणी समितीने दिलेली गुणवाढ आता रद्द न करण्याचा तसेच त्यांना त्यानुषंगाने दिलेला लाभही काढून न घेण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, कार्यक्रम बाबीव्दारे सादर केलेला ठराव मा.संचालक मंडळाने अमान्य केला.

**कार्यक्रम बाब क्र.१०**

विषय :- खामगाव पाणी पुरवठा योजना
सद्य:स्थितीत म.जी.प्रा.कडून करण्यात येत असलेल्या ठोक स्वरुपातील पाणी पुरवठयाऐवजी थेट ग्राहकांपर्यंत पाणीपट्टी वसुलीसह दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी योजना म.जी.प्रा.कडे हस्तांतरीत करुन घेण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

सद्य:स्थितीत खामगांव शहरास मजीप्रामार्फत ठोक स्वरुपात पाणी पुरवठा करण्यात येत असून, अंतर्गत वितरण व्यवस्थेची देखभाल दुरुस्ती, आकारणी व वसुली नगरपरिषदेमार्फत केली जाते. तथापि, या योजनेमध्ये अंदाजे ६४% इतकी पाणी गळती असल्याने, योजना तोट्यात चालते. त्यामुळे नागरिकांना सुरळीत पाणी पुरवठा करणे व देखभाल दुरुस्ती करणे नगरपरिषदेस अशक्य होत असल्याने, सदर योजना उद्भवापासुन थेट ग्राहकापर्यंत दैनंदिन देखभाल दुरुस्ती व पाणीपट्टी वसुलीसह मजीप्राने राबविण्यासाठी हस्तांतरित करण्याचा ठराव दि. ११.२.२०१३ रोजीच्या नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत पारित करण्यात आला असून, तशी विनंती मजीप्रास केली आहे.

सदर विनंतीनुसार, या योजनेचा अभ्यास केला असता, पहिल्या वर्षी अंदाजे रु. १.६६ कोटी तोटा अपेक्षित आहे. मात्र, सद्य:स्थितीतील वार्षिक ठोक दराऐवजी जलमापकाप्रमाणे पाणीपट्टी आकारणी केल्यास, तोटा कमी होणे अपेक्षित आहे. मात्र, २० वर्षांच्या कालावधीमध्ये रु. ५२.८२ कोटी महसुली अधिक्य मजीप्रास उपलब्ध होऊ शकेल, असे दिसून येते, असे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार सदर योजना मजीप्राकडे काही अटींच्या अधीन राहुन, ३० वर्षांसाठी हस्तांतरित करुन घेणे व दैनंदिन देखभाल दुरुस्ती व पाणीपट्टी वसुली करण्यास मा.संचालक मंडळाची मान्यता घेण्यासाठीची कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असून, त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती केली.

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा करण्यात आली. त्यानुसार चर्चेअंती, सदर योजना मजीप्राकडे हस्तांतरित करुन घेतल्यास अपेक्षित उत्पन्न, सद्य:स्थितीत असलेल्या नळ जोडण्या, पाणी गळतीचे प्रमाण इ.बाबतचा तपशील दर्शविणारे सादरीकरण मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, मजीप्रा, मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा उपाध्यक्ष, मजीप्रा तसेच प्रधान सचिव,पा.पु.व स्व.वि.यांना या अधिवेशन काळातच करण्यात यावे. या सादरीकरणाअंती जो काही निर्णय होईल, त्यानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.११**

विषय :- अंबाजोगाई पाणी पुरवठा योजना.
स्त्रोत ते थेट ग्राहकापर्यंत दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता
म.जी.प्रा.कडे हस्तांतरीत करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

सद्य:स्थितीत अंबाजोगाई शहरास नगरपरिषदेमार्फत पाणी पुरवठा करण्यात येत असून, योजनेची देखभाल दुरुस्ती, आकारणी व वसुलीही नगरपरिषदेमार्फत केली जाते. तथापि, या योजनेमध्ये अंदाजे ६२% इतकी पाणी गळती असल्याने, योजना तोट्यात चालते. त्यामुळे नागरिकांना सुरळीत पाणी पुरवठा करणे व देखभाल दुरुस्ती करणे नगरपरिषदेस अशक्य होत आहे. त्याचप्रमाणे नगरपरिषदेकडे तांत्रिक कर्मचारी व तांत्रिक सहाय्य पुरेसे प्रमाणात नसल्याने, अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. ही बाब विचारात घेऊन, सदर योजना उद्भवापासुन थेट ग्राहकापर्यंत दैनंदिन देखभाल दुरुस्ती व पाणीपट्टी वसुलीसह मजीप्राने राबविण्यासाठी हस्तांतरित करण्याचा ठराव दि.३०.१.२०१३ रोजीच्या नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत पारित करण्यात आला असून, तशी विनंती मजीप्रास केली आहे.

सदर विनंतीनुसार, या योजनेचा अभ्यास केला असता, पहिल्या वर्षी अंदाजे रु.३.७९ कोटी तोटा अपेक्षित आहे. मात्र, सद्य:स्थितीतील वार्षिक ठोक दराऐवजी जलमापकाप्रमाणे पाणीपट्टी आकारणी केल्यास, तोटा कमी होणे अपेक्षित आहे. मात्र, २० वर्षांच्या कालावधीमध्ये रु. ५५.९३ कोटी मजीप्रास महसुली अधिक्य उपलब्ध होऊ शकेल, असे दिसून येते, असे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार सदर योजना मजीप्राकडे काही अटींच्या अधीन राहुन, ३० वर्षांसाठी हस्तांतरित करुन घेणे व दैनंदिन देखभाल दुरुस्ती

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा..**

सदस्य सचिव
**म.जी.प्रा.**

व पाणीपट्टी वसुली करण्यास मा.संचालक मंडळाची मान्यता घेण्यासाठीची कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असून, त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती केली.

सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा करण्यात आली. त्यानुसार चर्चेअंती, सदर योजना मजीप्राकडे हस्तांतरित करुन घेतल्यास अपेक्षित उत्पन्न, सद्य:स्थितीत असलेल्या नळ जोडण्या, पाणी गळतीचे प्रमाण इ.बाबतचा तपशील दर्शविणारे सादरीकरण मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, मजीप्रा, मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा उपाध्यक्ष, मजीप्रा तसेच प्रधान सचिव,पा.पु.व स्व.वि.यांना या अधिवेशन काळातच करण्यात यावे. या सादरीकरणाअंती जो काही निर्णय होईल, त्यानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१२**

**विषय :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यांत येत असलेल्या पाणी पुरवठा केंद्रावर अल्ट्रासोनिक पध्दतीची घरगुती जलमापके उभारणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

मजीप्राच्या मालकीच्या पाणी पुरवठा केंद्रांतर्गत ग्राहकांच्या नळजोडणीवर एकूण ८०,९५६ जलमापके आवश्यक असून, त्यापैकी थेट ग्राहकांसाठी आवश्यक १५ ते ४० मि.मी. व्यासाच्या एकूण ८०,७०२ जलमापकांची आवश्यकता आहे. त्यासाठी येणाऱ्या खर्चाचा रु. २१.३७ कोटी किंमतीचा प्रस्ताव मा.संचालक मंडळाच्या १२५ व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदरचा निधी सुजल निर्मल अभियानांतर्गत प्राप्त करुन घेण्याचे प्रस्तावित होते. मात्र, या कार्यक्रमांतर्गत निधी प्राप्त न झाल्यास स्वनिधीतुन करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तद्नंतर, राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत सादर केलेल्या प्रस्तावावर सदरचा निधी सुजल निर्मल अभियानांतर्गत उपलब्ध करुन देता येत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सदर मान्यतेनुसार प्रथम टप्प्यात एकूण २०,००० जलमापके विविध पाणी पुरवठा केंद्रांवर उपलब्ध करुन देण्यासाठीची निविदा मागविण्यात येऊन, न्युनत्तम देकाराची निविदा स्वीकृत करण्यात आली असून, त्रयस्थ यंत्रणेकडून तपासणी इ.बाबतची कार्यवाही सुरु आहे. तथापि, लातूर पाणी पुरवठा योजनेमध्ये एकाही जोडणीवर जलमापके नसल्याने, सदर

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

निविदेंतर्गत सर्व जलमापके लातूर पाणी पुरवठा योजनेवर वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

उर्वरित जलमापके पुरवठा करुन घेण्याबाबतची कार्यवाही अद्याप हाती घेतलेली नाही. मात्र, दरम्यानच्या काळात अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असलेल्या अल्ट्रासोनिक तंत्रज्ञानाची ज्यामध्ये जलमापनासाठी आतील बाजुस कोणताही यांत्रिकी भाग नसल्याने, अचूक मापन होणार असल्याने, प्रायोगिक तत्वावर म्हणून मंजूर ८०,७०२ जलमापकांच्या प्रस्तावापैकी १०,००० जलमापके उपलब्ध करुन घेण्याचे प्रस्तावित असून, सदर जलमापके अंबरनाथ, माथेरान, लातूर व अमरावती पाणी पुरवठा केंद्रांवर उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठीची निविदा मागविण्यात आली असून, निविदेतील दर हे अंदाजपत्रकीय दरांनुसार पुरवठा करण्यास ठेकेदाराने संमती दर्शविली असल्याचे मा.संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

प्रस्तावित केल्यानुसार कार्यक्रम बाबीच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याची विनंती केली. त्यानुसार सदर बाबींवर चर्चा होऊन, प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येऊन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, वरील प्रस्तावात नमूद केल्यानुसार मा.संचालक मंडळाच्या मंजूर ठरावातील एकूण जलमापकांपैकी अत्याधुनिक तंत्रज्ञानावरील १०,००० अल्ट्रासोनिक जलमापके अंदाजित किंमतीनुसार घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर खर्च मजीप्राच्या निधीतून करण्यास व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास्तव मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१३**

विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या (नागरी) न्हावा - शेवा, प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतून होणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या दराचा सन २०१३-१४ साठी आढावा.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी प्रस्तावित दरवाढीबाबत संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सर्वकंष चर्चा झाली. सदर चर्चेत मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. तसेच मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

व स्वच्छता तथा उपाध्यक्ष मजीप्रा यांनी सदर प्रचलित पाणी पट्टी दरात १०% इतकी वाढ करण्याचे निर्देशीत केले. ते पुढील प्रमाणे.

**नागरी पाणी पुरवठा केंद्र :**

नागरी पाणी पुरवठा केंद्रांतर्गत न्हाव्हा शेवा पाणी पुरवठा केंद्राच्या, प्रकल्प क्षेत्र (अंबरनाथ-बदलापूर केंद्र) त्याचप्रमाणे प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रांच्या विद्यमान दरात केलेली १०% वाढ मान्य करण्यात येत आहे.

सदर निर्देशाच्या अनुषंगाने दर रचना प्रस्तावित करुन पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**ग्रामीण पाणी पुरवठा योजना :**

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी विद्यमान दरामध्ये १०%इतकी वाढ मान्य करण्यात येत आहे.

अ) **नागरी पाणी पुरवठा योजना :-**

अ.१) असा ठराव करण्यात येतो की, न्हावा शेवा पाणी पुरवठा केंद्रातुन होणाऱ्या पाणी पुरवठयाचे दर पुढे प्रस्तावित केल्याप्रमाणे दिनांक १/९/२०१३ पासून अथवा सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून आकारण्यात यावेत.

**न्हावा-शेवा पाणी पुरवठा केंद्र :-**

(रुपये)

| क्र. | तपशिल | पाण्याचे दर (प्रति १००० लिटरसाठी) |
|---|---|---|
| | घाऊक पाणी पुरवठा | प्रस्तावित |
| १ | सिडको | रु. ८.०० |
| २ | जे.एन.पी.टी/सेझ | रु. २२.०० |
| ३ | पनवेल नगरपालिका | रु. ९.०० |
| ४ | ग्रामपंचायती | रु. ३.५० |
| ५ | वरील वर्गवारी व्यतिरीक्त, हाऊसिंग प्रोजेक्ट, लघु उद्योग संस्था व इतर संस्था | |
| | अ) घरगुती | रु. १३.०० |
| | ब) बिगर घरगुती | रु. ६६.०० |

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

अ.२) असा ठराव करण्यात येतो की, प्रकल्प क्षेत्रा अंतर्गत अंबरनाथ बदलापूर, पाणी पुरवठा. केंद्रातुन होणाऱ्या पाणी पुरवठयाचे दर पुढे प्रस्तावित केल्याप्रमाणे दिनांक १/९/२०१३ पासून अथवा सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून आकारण्यात यावेत.

[एक] जलमापक यंत्राद्वारे पाणी पुरवठा

(पाण्याचे दर रुपयात प्रती १००० लिटर)

| क्र. | तपशिल | प्रस्तावित |
|---|---|---|
| १. | घाऊक पाणी पुरवठा | |
| अ] | घरगुती | १०.०० |
| ब] | बिगर घरगुती | ४०.०० |
| २. | विशेष ग्राहक | |
| | आयुध निर्मित कारखाना | २२.०० |

| अ. क्र. | तपशिल | एकूण पाणी वापरास प्रति १००० लिटर दर | पाण्याचा वापर १५००० लिटर पर्यंत | पाण्याचा वापर १५००१ ते २५००० लिटर पर्यंत | पाण्याचा वापर २५००१ च्यापुढे |
|---|---|---|---|---|---|
| ३. | किरकोळ पाणी पुरवठा | | | | |
| | (i) घरगुती | | १०.०० | १५.४० | २०.०० |
| | (ii) बिगर-घरगुती | ४६.०० | | | |
| ४. | खाजगी दवाखाना, (बाहय रुग्ण दवाखाना) वैद्यकिय दुकान,किराणा अथवा घाऊक मालाचे दुकान | २३.०० | | | |
| ५. | शाळा, महाविदयालय, धर्मादाय संस्था, सरकारी व निमसरकारी कार्यालय, सरकारी रुग्णालय यासारख्या ना नफा ना तोटा तत्वावर चालणा-या संस्थाना केलेला पाणी पुरवठा | २२.०० | | | |

[दोन] मापन यंत्र बसविण्यांत आलेल्या नळ जोडण्यासाठी प्रति महा किमान दर रुपयात.

ज्या नळ जोडणीवर मापनयंत्र बसविले असतील परंतू घर बंद असल्यामुळे, त्या बंद करण्याबाबत कळविले असेल अशा, तसेच ज्या ग्राहकांकडून वसुल करावयाचे मासिक आकार खाली दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा कमी असेल अशा ग्राहकांच्या बाबतीत खालील किमान आकार आकारण्यात यावे.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

[रुपये]

| नळ जोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडणीस प्रति माह | उपरोक्त [४] व [५] मध्ये निर्विदिष्ट केलेल्या संस्थांसाठी प्रति नळ जोडणीस प्रतिमाह | किरकोळ बिगर घरगुती प्रति नळ जोडणीस प्रति माह |
|---|---|---|---|
| | प्रस्तावित | प्रस्तावित | प्रस्तावित |
| १५ मिलीमिटर | १८६ | ४३३ | ८३३ |
| २० मिलीमिटर | ३४० | ७९२ | १५३८ |
| २५ मिलीमिटर | ४९९ | ९८५ | २२३० |
| ३२ मिलीमिटर | ७३९ | १७२४ | ३३०८ |
| ४० मिलीमिटर | १२८५ | ३००२ | ५७७६ |
| ५० मिलीमिटर | १६३१ | ३७८० | ७३०७ |
| ६५ मिलीमिटर | १९९७ | ४६४५ | ८९६५ |

[तीन] मापन यंत्र विरहित नळ जोडणीस किमान आकार प्रति महा प्रति नळ जोडणीस.

सर्व नळजोडणीवर मापनयंत्र असावेत मात्र जेथे मापनयंत्र बसविलेले असतील परंतू तीन महिन्यापेक्षा अधिक काळ चालू स्थितीत नसतील, व मागील तीन महिन्याचे सरासरी देयक खालील किमान आकारापेक्षा कमी असेल, अशा प्रकरणी पुढे दर्शविल्या प्रमाणे किमान आकार आकारण्यात यावेत. जर तीन महिन्यांचे सरासरी देयक किमान आकारापेक्षा अधिक होत असल्यास सरासरी देयक आकारण्यात यावेत.

[रुपये]

| नळजोडाचा व्यास | घरगुती | उपरोक्त [४] व [५] मध्ये नमुद केलेल्या ना नफा तत्वावर चालणाऱ्या या संस्थांसाठी | बिगर घरगुती |
|---|---|---|---|
| | प्रस्तावित | प्रस्तावित | प्रस्तावित |
| १५ मिलीमिटर | २५३ | ४९९ | ११०४ |
| २० मिलीमिटर | ४३३ | ८६५ | १९५६ |
| २५ मिलीमिटर | ८९१ | १७८३ | ३९९३ |

अ (३) असा ठराव करण्यात येतो की, प्रकल्प क्षेत्रा बाहेरील पाणी पुरवठा केंद्रातुन होणाऱ्या पाणी पुरवठयाचे दर पुढे प्रस्तावित केल्याप्रमाणे दिनांक १/९/२०१३ पासून अथवा सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून आकारण्यात यावेत.

[एक] जलमापक यंत्राद्वारे पाणी पुरवठा पाण्याचे दर रुपयात प्रती १००० लिटर)

(रुपये)

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

| अ. क्र | तपशिल | प्रस्तावित |
|---|---|---|
| १. | घाऊक पाणी पुरवठा | |
| अ] | घरगुती | |
| i] | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाकडे वीज देयके परस्पर भरणा-या नगरपालिकांना केलेला घाऊक पाणी पुरवठा | ६.६० |
| ii] | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाकडे वीज देयके न भरणा-या नगरपालिकांना केलेला घाऊक पाणी पुरवठा | १३.२० |
| iii] | मुख्य वितरण नलिकेतून प्रतिमहा २ द.ल.लिटर पेक्षा जांस्त पाणी घेणारे ग्राहक | १३.२० |
| iv] | ग्रामीण भागासाठी [ग्रामपंचायत व जिल्हा परिषद] घाऊक घरगुती पाणी पुरवठा | ६.६० |
| ब] | बिगर घरगुती | |
| i] | बिगर घरगुती घाऊक/औद्योगिक | ६६.०० |
| ii] | ग्रामीण भागासाठी [ग्रामपंचायत व जिल्हा परिषद] घाऊक बिगरघरगुती / औद्योगिक पाणी पुरवठा | ३१.०० |
| क) | विशेष ग्राहक | |
| | लष्करी कारखान्यांना केलेला शुध्द पाणी पुरवठा | |
| अ] | अंबाझरी | २६.४० |
| ब] | ओझर | २६.४० |
| क] | अणुशक्ती केंद्र तारापूर | २६.४० |

(पाण्याचे दर रुपयात प्रती १००० लिटर)

| अ. क्र. | | तपशिल | एकूण पाणी वापरास प्रति १००० लिटर दर | पाण्याचा वापर १५००० लिटर पर्यंत | पाण्याचा वापर १५००१ ते २५००० लिटर पर्यंत | पाण्याचा वापर २५००१ च्यापुढे |
|---|---|---|---|---|---|---|
| (२) | | किरकोळ पाणी पुरवठा | | | | |
| अ] | | घरगुती | | | | |
| | (i) | निवासस्थाने | | १४.३० | २२.०० | ३०.०० |
| | (ii) | ग्रामीण भागासाठी किरकोळ घरगुती पाणी पुरवठा | | ६.६० | १०.०० | १३.२० |
| ब] | | बिगर घरगुती | | | | |

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (i) | क वर्ग नगरपालिकेला क्षेत्राशिवाय इतर नगरपालिका क्षेत्रात केलेला बिगर घरगुती पाणी पुरवठा | ६६.०० | | | |
| | (ii) | क वर्ग नगरपालिका क्षेत्रात दरमहा २ द.ल.लि.पर्यंत पाणी वापर करणाऱ्या बिगर घरगुती ग्राहकासाठी पाणी पुरवठा जे ग्राहके दरमहा २ द.ल.लि.पेक्षा जास्त वापर करतात, त्यांना उपरोक्त एक (ब)(i) प्रमाणे दर आकारणी करण्यात येईल, बिगर घरगुती घाऊक. | ४०.७० | | | |
| (३) | | शाळा, महाविदयालय, धर्मादाय संस्था, सरकारी व निमसरकारी कार्यालय, सरकारी रुग्णालय यासारख्या ना नफा ना तोटा तत्वावर चालणा-या संस्थाना केलेला पाणी पुरवठा | २७.५० | | | |
| (४) | | गिरीस्थाने | | | | |
| | (i) | घरगुती | | १५.४० | २३.०० | ३१.०० |
| | (ii) | बिगर घरगुती | | | | |
| | (a) | शाळा, महाविदयालय, धर्मादाय संस्था, सरकारी व निमसरकारी कार्यालय, सरकारी रुग्णालय यासारख्या ना नफा ना तोटा तत्वावर चालणा-या संस्थाना केलेला पाणी पुरवठा | ४०.०० | | | |
| | (b). | निम्न बिगर घरगुती (Semi Non Domestic Class) | ४०.०० | | | |

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (c) | अ वर्ग हॉटेल्स | १२२.०० | |
| | (d) | ब वर्ग हॉटेल्स | ९७.०० | |
| | (e) | क वर्ग हॉटेल्स | ८१.०० | |
| | (f) | इतर | ८१.०० | |

[दोन] मापन यंत्र बसविण्यांत आलेल्या नळ जोडण्यासाठी प्रति महा किमान दर रुपयात.

ज्या नळ जोडणीवर मापनयंत्र बसविले असतील परंतू घर बंद असल्यामुळे त्या बंद करण्याबाबत कळविले असेल अशा, तसेच ज्या ग्राहकांकडून वसुल करावयाचे मासिक आकार खाली दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा कमी असेल अशा ग्राहकांच्या बाबतीत खालील किमान आकार आकारण्यात यावे.

[रुपये]

| नळ जोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडणीस प्रति माह | | उपरोक्त २ [ब] [३] मध्ये निर्विर्दिष्ट केलेल्या संस्थांसाठी प्रति नळ जोडणीस प्रतिमाह | किरकोळ बिगर घरगुती प्रति नळ जोडणीस प्रति माह |
|---|---|---|---|---|
| | शहरी | ग्रामीण | | |
| १५ मिलीमिटर | १४० | ७० | २९५ | ६८८ |
| २० मिलीमिटर | २८८ | १३४ | ५८३ | १३६१ |
| २५ मिलीमिटर | ५४१ | २६० | ११५८ | २७३० |
| ३२ मिलीमिटर | ८२२ | ३९३ | १७२६ | ४२११ |
| ४० मिलीमिटर | १११७ | ५१९ | २३१६ | ५४४० |
| ५० मिलीमिटर | १४०४ | ६४६ | २८७१ | ६८१५ |
| ६५ मिलीमिटर | १७८२ | ८२८ | ३७४८ | ८८५६ |

[तीन] मापन यंत्र बसविण्यात आलेल्या गिरीस्थानक नळ जोडण्या प्रतिमहा प्रति जोडणी दर रुपयात:

[रुपये]

| नळ जोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडणीस प्रति माह | बिगर घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडणीस प्रति माह | | | इतर ग्राहकांना बिगर घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडणीस प्रतिं माह |
|---|---|---|---|---|---|
| | | अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग | |
| १५ मिली मिटर | १६२ | १४६० | १०९५ | ८९२ | ६८८ |
| २० मिली मिटर | २९५ | २८३५ | २१०५ | १५१६ | १३६८ |
| २५मिली मिटर | ५७५ | ५६७८ | ४२११ | ३२१४ | २७३० |
| ३२ मिली मिटर | ८०० | ८५९० | ६४८५ | ४८१४ | ४२११ |
| ४० मिली मिटर | ११५८ | १०७०३ | ८४२९ | ६२४६ | ५४४० |
| ५० मिली मिटर | १५१६ | १४२६८ | १०५४० | ७७५५ | ६८२१ |
| ६५ मिली मिटर | १९६५ | १८६४७ | १३६१५ | १००७७ | ८८५६ |

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

[चार] मापन यंत्र विरहित नळ जोडणीस किमान आकार दर प्रतिमाह प्रति जोडणी रुपयांत.:

सर्व नळजोडणीवर मापनयंत्र असावेत मात्र जेथे मापनयंत्र बसविलेले असतील परंतू तीन महिन्यापेक्षा अधिक काळ चालू स्थितीत नसतील अशा प्रकरणी व मागील तीन महिन्याचे सरासरी देयक खालील किमान आकारापेक्षा कमी असेल, अशावेळी पुढे दर्शविल्या प्रमाणे किमान आकार आकारण्यांत यावेत. तीन महिन्यांचे सरासरी देयक किमान आकारापेक्षा अधिक होत असल्यास सरासरी देयक आकारण्यात यावेत.

[रुपये]

| नळ जोडणीचा व्यास | घरगुती | उपरोक्त २ [ब] [३] मध्ये नमुद केलेल्या ना नफा ना तोटा तत्वावर चालणा-या संस्था या सस्थांसाठी | बिगर घरगुती |
|---|---|---|---|
| १५ मिली मिटर | ४२१ | ६४६ | १६२१ |
| २० मिली मिटर | ६४६ | १२८५ | ३२४२ |
| २५ मिली मिटर | १२४९ | ३२४२ | ६५१२ |

[पाच] मापन यंत्र विरहित नळ जोडणीस गिरीस्थानकासाठी किमान आकार प्रतिमहा प्रति नळ जोडास

[रुपये]

| नळजोडणीचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळजोडणीस प्रति माह | | बिगर घरगुती वापरासाठी प्रति नळजोडणीस प्रति माह | | |
|---|---|---|---|---|---|
| | शहरी | ग्रामीण | अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग |
| १५ मिली मिटर | ३५१ | १५४ | ३४०५ | २५१२ | १९८७ |
| २० मिली मिटर | ६८८ | ३०३ | ७२९९ | ५४६७ | ४१०६ |
| २५मिली मिटर | १३६१ | ५९० | १३१७४ | ९८८९ | ७७९० |

[सहा] मापनयंत्र विरहित सार्वजनिक नळ खांब्याच्या जोडण्यासाठी किमान आकार:
अ)

[रुपये]

| | नळजोडणीचा व्यास | | प्रस्तावित |
|---|---|---|---|
| अ | १५ मिली मिटर | सार्वजनिक नळ खांब | रु. २५९६ प्रति माह |
| ब | २० मिली मिटर | सार्वजनिक नळ खांब | रु. ६२४६ प्रति माह |
| क | २५ मिली मिटर | सार्वजनिक नळ खांब | रु. १३३८९ प्रति माह |

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

ब) जेथे सार्वजनिक नळ जोडणीस मापनयंत्र बसविण्याची व देखभालीची जबाबदारी ही मालकाची असेल, व बसविलेले मापनयंत्र तीन महिन्यापेक्षा अधिक काळ ना दुरुस्त असतील तर मागील तीन महिन्याचे सरासरी वापर किंवा मापनयंत्र नसलेल्या सार्वजनिक नळ खांबासाठी असलेला दर यापैकी जो जास्त असेल ते बील आकारण्यात येईल.

अ (४) असा ठराव करण्यात येतो की, पुढे नमुद केलेल्या प्राधिकरणामार्फत चालविण्यात येत असलेल्या म.जी.प्रा. च्या मालकीच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतून होणाऱ्या पाणी पुरवठयासाठी प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रांना प्रस्तावित केल्याप्रमाणे दि. १/९/२०१३ पासून अथवा सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून आकारण्यात यावेत.

| अ.क्र | जिल्हा | योजनेचे नांव |
|---|---|---|
| १ | नाशिक | ओझर साकोरा |
| २ | नागपूर | महादुला |
| ३ | वर्धा | पिंपरी - मेंघे |
| ४ | चंद्रपूर | अहेरी |
| ५ | यवतमाळ | माळपठार |
| ६ | पुणे | चाकण |

[सात] उपरोक्त अ-१, अ-२,अ-३ व अ-४ क्षेत्रातील पाणी पुरवठयासाठी पुढील अटी लागु राहतील :-

१. सार्वजनिक नळ खांबे :- सध्याचे नळ खांबे बंद करण्यांत यावीत व यापुढे नवीन नळ खांब मंजुर करण्यात येऊ नये.

२. ठोक पाणी पुरवठा- ठोक पाणी पुरवठयासाठी मासिक किमान आकार, करारपत्रात नमुद केल्याप्रमाणे राहतील, परंतु असे मासिक किमान आकार प्रत्येक नळ जोडास २ द.ल.लिटर पाण्याच्या आकारापेक्षा कमी असता कामा नये.

३. त्वरीत प्रदानाकरीता सुट (रिबेट) -

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम ४४(अ) अन्वये देयक वितरीत झालेपासून १५ दिवसांचे आंत देयकाचे प्रदान ग्राहकाने करणे आवश्यक आहे. जे ग्राहक देयकाचे प्रदान १० दिवसांचे आंत करतील त्यांना चालू देयकाच्या २% सुट (रिबेट) देण्यात येईल.

२) ज्या ग्राहकाकडे थकबाकी नाही अशा ग्राहकांनी पुढील बारा महिन्याचे अंदाजित आकार आगाऊ भरतील त्यांना आगाऊ भरलेल्या रक्कमेवर पाच टक्के सूट देण्यात येईल. अंदाजित देयके मागील दोन महिन्याच्यां सरासरी वापरावर असेल.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

आयत्या वेळेच्या कार्यक्रम बाबी.

कार्यक्रम बाब क्र.१

विषय :- माथेरान सुधार पाणी पुरवठा योजना.
कुंभे ते फिल्टर हाऊसपर्यंतची उर्ध्ववाहीनी कार्यान्वित करण्याकरीता प्राधिकरणाचा निधी मिळणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

पर्यटन कार्यक्रमांतर्गत मंजूर व प्रगतीपथावरील माथेरान पाणी पुरवठा योजनेस वित्तीय आकृतीबंधानुसार पर्यटन विभागामार्फत रु.२४००.१२ लक्ष इतके शासकीय अनुदान म्हणून उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. यापैकी पर्यटन विभागाने केवळ रु.६६५ लक्ष इतकाच निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्याचप्रमाणे उपलब्ध करुन दिलेला निधी हा मार्जिन मनी म्हणून समजण्यात यावा व उर्वरित निधी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपलब्ध करुन घ्यावा, असे पर्यटन विभागाने मजीप्रास कळविले आहे.

तथापि, या योजनेतील कामे प्रगतीपथावर असून, प्राप्त निधी पूर्णपणे खर्ची पडला असून, त्यापुढील कामासाठी ठेकेदाराची देयके प्रलंबित होती. त्याचप्रमाणे अस्तित्वातील योजनेची स्थिती अत्यंत खराब असल्याने, प्रगतीपथावरील योजना पूर्ण होणे अत्यावश्यक असल्याने, निधीची पर्यायी व्यवस्था होईपर्यंत मजीप्राच्या स्वनिधीतील रु.१५१.८८ लक्ष इतका निधी मा.संचालक मंडळाची मान्यता अपेक्षुन मुक्त केला असल्याचे संचालक मंडळास अवगत करण्यात आले. त्याचप्रमाणे या योजनेतील कुंभे ते फिल्टर हाऊस हा भाग कार्यान्वित करण्याकरिता अद्याप रु. २४२.०२ लक्ष इतका निधी आवश्यक आहे. म्हणजेच एकूण रु.३९३.९० लक्ष इतका स्वनिधी उपलब्ध करणे प्रस्तावित आहे. त्यानुसार मजीप्राने स्वनिधीतुन उपलब्ध करुन दिलेल्या निधीबाबतच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता व उर्वरित रु. २४२.०२ लक्ष इतका निधी स्वनिधीतुन उपलब्ध करण्यास, शासनाच्या पर्यटन खात्यामार्फत निधी उपलब्ध करुन घेण्याच्या अटींच्या अधीन राहुन मा.संचालक मंडळाची मान्यता प्रदान करण्याची विनंती करण्यात आली.

सदर बाबी अवगत करीत असताना, असेही निदर्शनास आणुन देण्यात आले की, नुकतेच दि.२१.५.२०१३ रोजी मा. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत व त्याचबरोबर दि.२.७.२०१३ रोजी मा.मंत्री, जलसंपदा तथा पालकमंत्री, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या कामासाठीचा उर्वरित निधी येत्या अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे. सबब, उर्वरित निधी

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

४. विलंब आकार - जे ग्राहक देयक दिल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत पाण्याचे बील (थकबाकीसह) भरण्यास कसुर करील अशा ग्राहकांना देयक देण्यात आलेल्या दिनांकापासून १५ दिवसाचा कालावधीत संपेल त्या दिनांकापासून त्यांच्या सर्व रकमेवर (थकबाकीसह) दरमहा १ टक्का दराने विलंब शुल्क आकारण्यात येईल. ग्राहकांने सतत सहा महिने देयक (विलंब शुल्का सह ) भरणा करण्यास कसूर केल्यास त्याला होणारा पाणी पुरवठा बंद करण्यास तो पात्र ठरेल.

ब) **ग्रामीण पाणी पुरवठा योजना :**

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणामार्फत चालविण्यात येत असलेल्या म.जी.प्रा. च्या मालकीच्या पाणी पुरवठा केंद्राव्यतिरिक्त इतर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांतून होणाऱ्या पाणी पुरवठयाचे पुढीलप्रमाणे प्रस्तावित दर दिनांक १/९/२०१३ पासून अथवा मा.सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून आकारण्यात यावेत.

(एक) जलमापक यंत्राद्वारे पाणी पुरवठा

| | | (दर रुपयात प्रति १००० लिटर) |
|---|---|---|
| १ | घरगुती | ७.५०/१००० लिटर |
| २ | बिगर घरगुती | ३०.००/१००० लिटर |
| ३ | ना नफा ना तोटा तत्वावर चालणाऱ्या संस्था | २०.००/१००० लिटर |

**(दोन) मापन यंत्राशिवाय पाणी पुरवठा**

| नळ जोडाचा आकार मि.मी.मध्ये | दर प्रतिमहा प्रती जोडणी घरगुती | ना नफा ना तोटा तत्वावर चालणा-या संस्था | बिगर घरगुती |
|---|---|---|---|
| १५ मि.मी. | रु. १२५.०० | रु. २७५.०० | रु. ३०५.०० |
| २० मि.मी. | रु. २४५.०० | रु. ४२५.०० | रु. ४२५.०० |
| २५ मि.मी. | रु. ३६५.०० | रु. ५७५.०० | रु. ५७५.०० |

**(तीन) सार्वजनिक नळ खांब**

१५ मि.मि. - १५०० प्रति माह
२० मि.मि. - ३६०० प्रति माह
२५ मि.मि. - ७५०० प्रति माह

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

उपलब्ध होण्यात कोणतीही अडचण नसल्याने, प्रस्तावित केल्यानुसार कार्यक्रम बाबीच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याची विनंती केली.

त्यानुसार सदर बाबींवर चर्चा होऊन, प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येऊन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

वरील प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे माथेरान शहरास, जुन्या गंजलेल्या पाईपलाईनमुळे होणारा अपुऱ्या पाणी पुरवठयात सुधारणा करण्यासाठी कुंभे ते फिल्टर हाऊसपर्यंतच्या उर्ध्ववाहिनीचे काम करण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे. या कामासाठी लागणारा रु.३९३.९० लक्ष (रु.१५१.८८+२४२.०२) इतका खर्च भागविण्यासाठी म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून निधी उपलब्ध करुन घेण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

त्याचबरोबर शासनाच्या पर्यटन खात्यामार्फत निधी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करणे व दरम्यानच्या काळात विशेष बाब म्हणून म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून हे काम करुन घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.२**

**विषयः-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या/अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या वेळोवेळी संपन्न होणाऱ्या बैठकीत जे निर्णय घेण्यात येतात, त्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्यात येते. त्यानुसार मा.संचालक मंडळाच्या १२८ व्या बैठकीपर्यंत निविदा समितीच्या ८० व्या बैठकीपर्यंत घेण्यात आलेल्या निर्णयावर मा.संचालक मंडळाने शिक्कामोर्तब केले आहे. दरम्यानच्या काळात निविदा समितीच्या दोन बैठका (अनुक्रमे ८१ व ८२) संपन्न झाल्या असून, निविदा स्वीकृतीच्या/अस्वीकृतीच्या घेतलेल्या निर्णयावर मा.संचालक मंडळाने शिक्कामोर्तब करण्याची विनंती करण्यात येत आहे.

सदर कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळात चर्चा होऊन निविदा समितीने घेतलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

सदस्य सचिव
**म.जी.प्रा.**

कार्यक्रम बाब क्र.३

विषय :- पनवेल तालुक्यातील प्रस्तावित रेंटल हाऊसिंग स्किमसाठी म.जी.प्रा.मार्फत पाणी पुरवठा करण्यासाठी म.जी.प्रा.च्या मालकीच्या न्हावा शेवा पाणी पुरवठा योजनेचे नुतनीकरणाबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास पुढीलप्रमाणे अवगत केले.

एम.एम.आर.डी.ए.च्या रेंटल हौसिंग प्रकल्पासाठी ८५ द.ल.लि. पाण्याची मागणी व रोहिंजण येथील प्रकल्पासाठीची प्रकल्पीत पाण्याची मागणी विचारात घेऊन रु.१८०.१० कोटी + रु.२९.१६ कोटी = रु.२०९.२६ कोटी एकत्रित योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन दि.२१.११.२०१२ रोजी संपन्न झालेल्या म.जी.प्रा.संचालक मंडळासमोर कार्यक्रम बाब क्र. ७ अन्वये सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावाबाबत मा.संचालक मंडळाच्या बैठकीवर सविस्तर चर्चा होऊन तत्वतः मंजुरी देऊन विविध निर्देश देण्यात आले होते.

त्यानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत मा.संचालक मंडळा अवगत करण्यात आले. सदर रु. २०९.२६ कोटी खर्चाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी व त्यांच्या देय भांडवली हिश्याचा रु. ९४ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी एम.एम.आर.डी.ए.यांच्याकडे सादर करण्यात आल्यानंतर, त्यास एम.एम.आर.डी.ए. यांनी मंजुरी प्रदान केली आहे. त्यानुसार करारनामा करण्यात येणार आहे. मजीप्राने उपलब्ध करावयाच्या कर्जापोटीच्या रु. ७५ कोटीच्या प्रस्तावास हुडकोने मान्यता प्रदान केली असून, त्यास राज्यशासनाची संमती प्राप्त होण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

सदर प्रस्तावात समाविष्ट पनवेल नगरपरिषदेच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव सुजल निर्मल अभियानांतर्गत निधी उपलब्धतेसाठी शासनास सादर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे समाविष्ट ग्रामीण भागासाठीचा रु.४.६० कोटी किंमतीचा प्रस्तावही शासनाच्या तत्वतः मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सिडको भागासाठी रु २४ कोटी अर्थसहाय्य देण्यास तत्वतः अनुमती दर्शविली आहे.

थोडक्यात, मा.संचालक मंडळाच्या १२६ व्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात आली असून, रु.२०९.२६ कोटी खर्चाच्या योजनेस मजीप्राची योजना म्हणून प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करणे तसेच योजनेतील समाविष्ट शिर्षानुसार शासनाकडून व संबंधित शासन नियंत्रिक संस्थांकडून मंजुरी प्राप्त करुन निधी उपलब्ध करुन घेणे, कर्ज उभारणे व योजनेची एकत्रित अंमलबजावणी करणे आवश्यक

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

असल्याने, तसा प्रस्ताव कार्यक्रम बाबीद्वारे मा.संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती करण्यात आली.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, सदर योजना ही मजीप्राच्या हिताची असल्याने सादर केलेल्या या प्रस्तावास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान करुन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, पनवेल शहरालगतच्या वेगाने विकसित होणाऱ्या मुंबई महानगर विकास प्राधिकरण नियंत्रित पळस्पे व रोहिंजण येथील निवासी गृहसंकुलांसाठी ८५ द.ल.लि. प्रतिदिन पिण्याच्या पाण्याची मागणी विचारात घेऊन वाढीव न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना एम.एम.आर.डी.ए.च्या भांडवली अर्थसहाय्यातून इतर लाभार्थी संस्थांकडून पूर्ण ठेव अंशदान तत्वावर निधी उपलब्ध करुन घेऊन राबविण्याबाबत संचालक मंडळाच्या १२६ व्या बैठकीत बाब क्र.७ अन्वये तत्वत: मंजूरी देण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदर योजनेच्या एकूण रु.२०९.२६ कोटी ढोबळ खर्चामध्ये एम.एम.आर.डी.ए.भांडवली अर्थसहाय्य, पूर्णठेव अंशदान, महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल अभियान, सिडकोचे भांडवली अर्थसहाय्य व म.जी.प्रा.ने कर्ज रुपाने उभारावयाचा स्वनिधी इत्यादी लेखा शिर्षांतर्गत निधी उपलब्ध करुन घेण्याचे प्रस्तावित केलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल अभियानातंर्गत शासनाकडून प्राप्त होणा-या निधीच्या हिश्यापोटी खर्चाच्या योजनेस मजीप्राची योजना म्हणून प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा. तसेच योजनेतील समाविष्ठ शिर्षांनुसार शासनाकडून व संबंधीत शासन नियंत्रित संस्थांकडून मंजूरी प्राप्त करुन निधी उपलब्ध करुन घेणे,योजनेसाठी आवश्यकतेनुसार वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारणे, करारनामा करणे, तसेच म.जी.प्रा.मार्फत एकत्रितपणे योजनेची अंमलबजावणी करणे यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

याशिवाय असाही ठराव करण्यात येतो की, पहील्या टप्प्यात MMRDA कडील भांडवली हिस्सा रु.९४.०० कोटी व हुडकोकडे कर्ज रु.७५.०० कोटी असे एकुण रु.१६९.०० कोटी पर्यंतच्या किंमतीच्या मर्यादेत निविदा मागविण्यात याव्यात.

१) बैठकीदरम्यान मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, मजीप्रा यांनी, सांगोला तालुक्याची वरदायिनी असलेल्या शिरभावी पाणी पुरवठा योजनेत आवश्यक दुरुस्त्या

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

करण्यासाठीच्या, त्याचप्रमाणे सातारा येथील माहुली हेडवर्क्सच्या सादर केलेल्या प्रस्तावास लवकरात लवकर मान्यता प्राप्त करुन घेण्याचे व कामे पूर्ण होण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

यापैकी शिरभावी पाणी पुरवठा योजनेचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात आले होते. तथापि, त्यास मान्यता अप्राप्त असल्याचे निदर्शनास आणुन देण्यात आले असता, फेरप्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले. त्याप्रमाणे माहुली हेडवर्क्सच्या प्रस्तावाच्या संदर्भात नमूद करण्यात आले की, सदर शहर नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत समाविष्ट असल्याने, या कार्यक्रमात प्रस्ताव नगर विकास विभागास पाठविण्याचे निर्देश प्राप्त असून, प्रस्ताव लवकरच सादर करण्यात येत असल्याचे अवगत करण्यात आले.

या व्यतिरिक्त बैठकीमध्ये इतर कोणतेही विषय नसल्याने, उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झाल्याचे घोषित करण्यात आले.

**मा.मंत्री,**
**पा.पु. व स्व. तथा**
**अध्यक्ष, म.जी.प्रा.**

सदस्य सचिव
म.जी.प्रा.